दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

● बीड/महाराष्ट्र ● सोमवार दि.२४ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-१२० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## रवींद्र धंगेकरांनी पक्षांतराच्या चर्चांवर सोडले मौन

**पुणे** –काँग्रेसचे माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी नुकतेच गळ्यात भगवे उपरणे घातलेले स्टेटस ठेवले होते. या स्टेटसनंतर रवींद्र धंगेकर शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. त्यातच मंत्री उदय सामंत यांनी त्यांना शिवसेनेत येण्याची ऑफर दिल्यामुळे चर्चेला हवा मिळाली होती. या सर्व घटनांवर रवींद्र धंगेकर यांनी प्रतिक्रिया दिली आहे. रील टाकण्याचे माझ्या मनात होते. शिवजयंतीचे वातावरण होते आणि त्या वातावरणात फोटो चांगला होता. यानंतर मग मी शिवसेनेत जाणार अशा चर्चा रंगल्या. असे धंगेकर म्हणाले. पण जाताना मी लपून जाणार नाही, असे सूचक विधानही रवींद्र धंगेकर यांनी केले आहे.काँग्रेसचे माजी आमदार रविंद्र धंगेकर गुरुवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना भेटण्यासाठी मुंबईतील शासकीय निवासस्थानी गेले होते. यावेळी रवींद्र धंगेकरांसह ठाकरे गटाचे माजी आमदार महादेव बाबरही उपस्थित होते. शिवाय त्यांनी स्टेटला भगवे उपरणे परिधान केलेला फोटो देखील पोस्ट केला होता. त्यामुळे एकनाथ शिंदेंच्या भेटीनंतर रविंद्र धंगेकर शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनी राजकीय वर्तुळात जोर धरला होता. यानंतर आता या भेटीबद्दल आणि आपल्या स्टेटसबद्दल रवींद्र धंगेकर यांनी स्पष्टीकरण दिले आहे.

### एकनाथ शिंदेंची शिवसेना नाहीतर त्यांची गद्दार सेना

# कोकाटेंच्या निर्णयाची प्रत कोर्टाने नार्वेकरांना द्यावी-उद्धव ठाकरे

**मुंबई (वृत्तसंस्था)**–एकनाथ शिंदेंची शिवसेना नाहीतर त्यांची गद्दार सेना आहे, तिकडे गेलेल्या लोकांवर मी काहीच बोलणार नाही. ज्यांना मी काही देऊ शकलो नाही, असे जुने शिवसैनिक माझ्यासोबत आहेत, असे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटले आहे.उद्धव ठाकरे म्हणाले की, राज्यात आणि देशात जी अराजकता पसरली आहे ती दूर करत आपले खरे हिंदुत्व आणि राष्ट्रीयत्व याचे रक्षण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. काँग्रेसचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष किरण काळे यांनी उद्धव ठाकरेंच्या उपस्थितीत ठाकरे गटात प्रवेश केला यावेळी बोलताना त्यांनी हे वक्तव्य केले आहे.

उद्धव ठाकरे म्हणाले की, धर्म हा जगायचा असतो सांगायचा नसतो असे संत गाडगेबाबा यांनी म्हटले आहे. त्यांनी सांगितलेली दशसुत्री मी मुख्यमंत्री असताना तो खरा धर्म आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी दुसऱ्या धर्माचा द्वेष करा असे काही शिकवले नाही. जे देशाला आपले मानतात ते आपलेच आहेत.उद्धव ठाकरे म्हणाले की, धर्माचा ज्यांनी खेळखंडोबा केला आहे त्यांचे राजकारणापुरते मुस्लीम प्रेम कसे आहे याचे मी दाखले तुम्हाला देऊ शकते. निवडणुकीसाठी हे जे सुरू आहे ते देशाला चांगल्या दिशेने नेईल असे मला वाटत नाही. धनंजय मुंडे, माणिकराव कोकाटे यांचे रक्षण करणे हे भाजपचे हिंदुत्व आहे? का असा सवाल उद्धव ठाकरेंनी उपस्थित केला आहे. माझ्या हिंदुत्वाची व्याख्या व्यवस्थित आहे भाजपचे काय?उद्धव ठाकरे म्हणाले की, आमच्याबद्दल ३ वर्षे होऊन सुद्धा न्यायालयाचा निकाल लागत आहे. न्यायाधिशांची कारकीर्द पूर्ण झाली तरी आमचा निकाल लागलेला नाही. याबाबतील निकाल लागला आहे तर प्रत नार्वेकरांना द्यावी.



# केजच्या नगराध्यक्षा सीताताई बनसोड यांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्कार जाहीर

### जागतिक महिला दिनी होणार मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

कसलाही शैक्षणिक, सामाजिक, राजकीय वारसा नसताना प्रतिकूल परिस्थितीवर मात करत सीताताई प्रदीप बनसोड यांनी उच्च शिक्षण घेतले. एवढेच नव्हे तर केज नगरीच्या सर्वाधिक कुशल आणि विकसनशील नगराध्यक्ष म्हणून त्यांनी सन्मान मिळवला आहे. शून्यातून विश्व कसं निर्माण करावं याचं प्रतीकात्मक रूप म्हणजेच सीताताई प्रदीप बनसोड होय. त्यांच्या या अभूतपूर्व कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक महिला दिनी जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

अमरावती जिल्ह्यातील येवदा या खेड्या गावामध्ये अतिशय सामान्य कुटुंबात सीताबाई यांचा देविदास बागडे कुटुंबीयात जन्म झाला.मजुरी करून वडील कसं बस कुटुंब चालवत होते. मात्र लहानपणापासूनच शिक्षणाची आवड असल्याने आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आत्मसात केल्याने शिक्षण हे वाघिणीचे दूध समजून सत्तेच्या खुर्चीवर जाण्याचे स्वप्न ज्यावेळी पोटभर एक वेळचं जेवण धड मिळत नव्हतं अशा परिस्थितीत त्यांनी पाहिलं.आणि स्वकर्तृत्वावर कुठलाही शैक्षणिक सामाजिक राजकीय वारसा नसतानाही त्यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एक इंग्रजीच्या अध्यापक पासून यशस्वी सामाजिक कार्यापर्यंत आणि पुढे थेट केज नगरीच्या नगराध्यक्ष म्हणून त्यांनी यशस्वी शैक्षणिक सामाजिक आणि राजकीय गरुड झेप घेतली आहे. एवढेच नव्हे तर भविष्यात आता आमदार होण्याचे स्वप्न त्यांनी पाहिले आहे ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी विधायक पावले उचलण्यास सुरुवात देखील केलेली आहे.त्यांच्या या अभूतपूर्व कार्याची दखल घेऊन त्यांना पत्रकार संघ आणि आश्रय सेवा केंद्राच्या वतीने जागतिक स्तरावरील स्त्रीरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार त्यांना जाहीर झाल्या बद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



### जगावेगळे वेगळेपण जपणाऱ्या महिलांनी पुरस्कारासाठी संपर्क करावा – शेख आयेशा

**ज्या महिलांनी शून्यातून विश्व निर्माण करत आपले अस्तित्व उभा केले आहे. अशा यशस्वी महिलांना जागतिक स्त्रीरत्न पुरस्काराने मान्यवरांच्या शुभहस्ते जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ८ मार्च २०२५ रोजी सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारास पात्र असणाऱ्या मुलींनी, महिलांनी आपल्या कार्य अहवालासह तात्काळ ७० ३० १४ ९३ २२ यानंबर वर संपर्क साधावा असे आवाहन आश्रय सेवा केंद्राच्या अध्यक्षा पत्रकार शेख आयेशा यांनी केले आहे.**

## शासकीय जमिनीवरील वसाहतींचे अतिक्रमणे निष्काशीत करण्याचे आदेश



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगाई येथील शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसरातील (बी.एड. कॉलेज) परिसरात माजी सैनिकांनी केलेल्या अतिक्रमणासह सह सर्वच शासकीय जमिनीवर अतिक्रमणे करुन बांधलेली पक्की अतिक्रमणे काढण्याचे राज्य शासनाचे आदेश आले असल्याने शहरातील सर्वच अतिक्रमीत शासकीय जागा सार्वजनिक बांधकाम विभाग ताब्यात घेवून त्या ठिकाणची अतिक्रमणे काढली जाणार आहेत. तसे आदेश राज्य सरकारचे असून शहारातील सर्व शासकीय जागांवरील अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण स्वतःहुन निष्काशीत करावे अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने पोलिस बंदोबस्तात ही अतिक्रमणे काढली जाणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांनी दिली आहे. अंबाजोगाई शहरातील बहुतांशी वस्त्या या शासकीय जागांवर अतिक्रमण करुन वसलेल्या आहेत. ज्यामध्ये सदर बाजार भागातील फ्लॉवर्स क्वार्टर, सदर बाजार विभागातील फालोअर्स क्वार्टर, उपजिल्हा कारागृह, अभियांत्रिकी महाविद्यालयासमोरील वसलेली शासकीय अध्यापक महाविद्यालय परिसरातील माजी सैनिकांची वसाहत, यशवंतराव चव्हाण चौक परिसरातील दुध संकलन केंद्र बाजुची वस्ती या व इतर अशा अनेक वस्त्यांच्या यात समावेश आहे. राज्य सरकारच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मालकीच्या जागांवरील मोठ्या प्रमाणात अतिक्रमण केले असून हे अतिक्रमण तात्काळ निष्काशीत करुन सर्व शासकीय जागा ताब्यात घेण्यात याव्यात असा शासन आदेश दि. २३ जानेवारी २०२५ रोजी निर्गमित झालेला असून त्याचा निर्णय क्रमांक हा साबांज. २०२४ प्र.क्र. १७९ /मिव्य १ असा आहे.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून अंबाजोगाई येथील घरफोडी करणारा आरोपी गजाआड




**अंबाजोगाई । परवेज पटेल**

अंबाजोगई शहरातील माऊली नगर, यशवंतराव चव्हाण चौकात घडफोडी झाल्याबाबत पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ८८ / २०२५ कलम ३०५,३३१ (४) बी. एन. एस. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असतांना पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. यांचे आदेशाने घरफोडीचे व वाहन चोरीचे गुन्ह्यांतील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत असतांना स्था.गु.शा.चे पथकास अंबाजोगाई शहरातील पोलीस कॉर्टर्स समोर राहणारा जुन्नीसींग इंदलसिंग टाक याने अंबाजोगई शहरात घरफोडी केल्याबाबत गोपनीय माहीती मिळाली. त्यावरुन स्था. गु. शा. चे पथकाने संशयीत आरोपी जुन्नीसिंग इंदलसिंग टाक याचा त्याचे राहते घरी शोध घेतला असता तो मिळुन आल्याने त्यास त्याचे नाव गांव विचारले असता त्याने त्याचे नाव जुन्नीसिंग इंदलसिंग टाक वय – ३१ वर्षे, रा. पोलीस कॉर्टर्स समोर, अंबाजोगई असे सांगीतले. त्यास घरफोडीबाबत विचारना केली असता त्याने सुरूवातीस उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्याला संशय आल्याने त्याने पोलीस पथकस धक्का देवुन पळू लागला त्यावेळी स्थागुशाचे पथकाने त्यास पाठलाग करुन ताब्यात घेतले. त्यास घरफोडीबाबत विश्वासात घेवुन विचापुस केली असता त्याने सांगीतले की, त्याने दिनांक १४/०२/२०२५ रोजीचे रात्री त्याचे साथीदार रितेश वसंत चव्हाण व एक अनोळखी साथीदार यांचे मदतीने माऊली नगर, यशवंतराव चौकात रात्रीच्या वेळी घरफोडी केल्याचे कबुल केले. गुन्ह्यातील इतर आरोपींना शोध घेतला असता आरोपींनी गुन्हा करतांना वापरलेली मोटार सायकल मिळुन आल्याने पोलीस पथकाने ती दोन पंचांसमक्ष जप्त केली आहे. सदर गुन्ह्यात आरोपी निष्पन्न करुन गुन्हा उघडकीस आणला आहे. सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल चोरमले, पोलीस निरीक्षक श्री. उस्मान शेख स्था. गु.शा. यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि श्री. विजयसिंग जोनवाल, पोउपनि. श्री. महेश विघ्ने, ग्रे. पोउपनि हनुमान खेडकर तुषार गायकवाड महेश जोगदंड जफर पठाण गणेश मराडे यांनी केली आहे.

# अंबाजोगाईतील चौकांच्या अनियमित आकारांमुळे अपघातांचा धोका वाढला!

### चौकांचे शास्त्रशुद्ध नियोजन करण्याची मागणी



**अंबाजोगाई । परवेज पटेल**

शहरातील वाहतूक व्यवस्थेचा महत्वाचा भाग असलेल्या चौकांचे नियोजन योग्य न झाल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक चौक त्रिकोणी, चौकोनी, उंच आणि अनियमित आकाराचे असल्याने वाहनधारकांना चौक ओलांडताना अडचण येत असून, यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे वाहतुकीच्या शास्त्रानुसार गोल चौक (रिंग जंक्शन) अधिक सुरक्षित मानले जातात, कारण त्यामध्ये वाहने सुरळीतपणे फिरू शकतात. मात्र, शहरातील काही चौक त्रिकोणी किंवा उंच असल्याने तसेच काही चौकांची उंची आणि रुंदी अतिशय जास्त असल्याने ब्लाईंड स्पॉट तयार होऊन वाहनचालकांना समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. त्यातच बहुतांशी चौक रस्त्याचा केंद्रबिंदू पकडून केलेले नाहीत. त्यामुळे वाहतुकीत गोंधळ निर्माण होतो आणि अनेकदा चुकीच्या दिशेने जाण्याचा प्रकार घडतो. परिणामी, अपघातांचे प्रमाण वाढत आहे. अनधिकृत चौकांची संख्या वाढली मागील काही वर्षात शहरात अनधिकृत चौकांची संख्या झपाट्याने वाढली. कुठलीही परवानगी न घेता, वाहतुकीचा विचार न करता मन मानेल तसे चौक रात्रीतून उभारले जात आहेत. अचानक रात्रीतून उभा राहिलेल्या चौकांमुळे अनेकदा अपघात झाले आहेत. त्यामुळे अशा अनधिकृत चौकांना आवर घालणे गरजेचे झाले आहे. चौकांचे शास्त्रशुद्ध नियोजन करा: नागरिकांची मागणी सुरक्षित वाहतुकीचं दृष्टीने चौकांचे नियोजन शास्त्रशुद्ध पद्धतीने व्हावे. वाहतुकीच्या सुरळीत व्यवस्थेसाठी योग्य अंतर राखून, गोलाकार आणि वाहनचालकांना स्पष्टपणे दिसतील अशा चौकांची रचना करावी अशी शहरातील विविध सामाजिक संघटना, वाहतूक तज्ञ, वास्तुविशारद आणि सामान्य नागरिक यांची मागणी आहे. चौकांचे अयोग्य नियोजन केवळ वाहतुकीला अडथळा ठरत नाही, तर ते अपघातांना आमंत्रण देते. चौकांचा उंचवटा योग्य पद्धतीने डिझाइन केला गेला पाहिजे, तसेच वाहनचालकांना स्पष्ट दृष्टी मिळेल, अशी रचना असणे आवश्यक आहे असे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे. प्रशासनाने लक्ष देण्याची गरज शहरातील वाहतूक अधिक सुरक्षित आणि प्रवाही होण्यासाठी प्रशासनाने त्वरित उपाययोजना करावी, अशी नागरिकांची मागणी आहे. यासाठी वाहतूक विभाग, शास्त्रज्ञ, वास्तुविशारद आणि स्थानिक नागरिकांच्या मतांचा विचार करून चौकांचे नव्याने नियोजन करणे आवश्यक आहे. तसेच, चुकीच्या दिशेने जाणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई केली जावी, अशीही मागणी नागरिकांतून होत आहे.

संपादकीय

# सुख म्हणजे नक्की काय?



मला सांगा, सुख म्हणजे नक्की काय असतं? प्रशांत दामले यांचं सुखाची आनंदाशी सांगड घालणारं प्रचंड लोकप्रियता लाभलेलं असं हे गीत. हे गाणं सादर होतांना ऐकणारे सर्वच श्रोते हळूवारपणे अशा आनंदोत्सवात आपोआप सहभागी होत जातात. चेहऱ्यावर पसरलेला आनंद म्हणजे वाट्याला आलेल्या सुखाचं दृश्य स्वरुपात व्यक्त होणं असतं. म्हणूनच 'सुखी राहा' असा आशीर्वाद मोठ्यांकडून दिला जातो. हा आशीर्वाद सुखी-समाधानी अन् आनंदी आयुष्य लाभावं, यासाठी दिलेला असतो. सुखं लाभलं की पुढची पायरी हर्षभरल्या क्षणांचं स्वागत करण्यासाठी मनाची कवाडं उघडण्याची असते. त्यानंतरच आपल्याला आल्हाददायक क्षणांचा मन:पूत आनंद मिळू शकतो.

लहान मुलांमध्ये आनंदाचा झरा सतत वाहात असतो. त्यांचं हसणं-खिदळणं, बागडणं, निरागसता या सर्वांमध्ये आनंद ठासून भरलेला असतो. मनासारखं घडलं की चेहऱ्यावर खुदकन् उमटलेलं हसू, ही झालेल्या आनंदाची पावती असते. लहानग्यांच्या अस्तित्वामुळे घर हसरं होतं, आनंदाचा सुखावणारा वर्षाव करणारं होतं. सात-आठ वर्षांच्या आमच्या नातवाला-ओमकारला आंब्याचं लोणचं अतिशय प्रिय होतं. मात्र, ओमकारच्या बाबांचा लोणचं कमी खाण्यावर कटाक्ष असायचा. आजी-आजोबा म्हणून आम्ही ओमकारचा हट्ट पुरवायचो, तोदेखील बाबा ऑफिसला गेल्याची खातरजमा केल्यावरच. या लोणच्यामुळेच एक दिवस एक गमतीदार प्रसंग ओढवला. माझ्या बाजूला जेवायला बसलेल्या ओमकारच्या पानात त्याच्या हट्टाप्रमाणे लोणच्याची मोठी फोड घातली. ओमकार खुशीत मजेत जेवायला सुरवात करणार इतक्यात दारावरची बेल वाजली. दोनदा वाजलेली बेल ही ओमकारच्या ओळखीची नव्हे तर त्याच्या बाबांच्या आगमनाची धोक्याची घंटा होती. हे लक्षात आल्यावर पुढच्या एका क्षणात ओमकारने त्याच्या पानातली लोणच्याची फोड उचलून माझ्या पानात टाकली आणि निश्चिंत होऊन मिश्किलपणे आम्हासर्वांकडे बघत राहीला. ओमकारचे बाबा आत आले, विसरलेली कामाची वस्तू घेऊन लगेच निघून गेले. मग निर्धास्त होऊन ओमकारने माझ्या पानातली लोणच्याची फोड पुन्हा स्वत:च्या पानात स्थानापन्न केली आणि त्यानंतर अवघड प्रसंगातून निसटल्याचा अन् आंब्याचं लोणचं फोडीसह चाखत-माखत खाण्याचा आनंदोत्सव त्याने आमच्यासह साजरा केला. लहानग्यांचा लडिवाळपणा, निरागसता म्हणजे सुखद क्षणांची पखरण असते, अंगणात पडणाऱ्या प्राजक्तांच्या फुलांच्या सड्यासारखी, ताजी टवटवीत.

सदासर्वकाळ आनंदात असावं, असं प्रत्येकाला मनोमन वाटतं. यासाठी गरज असते ती आपल्या आयुष्यात आलेले सौख्याचे, आनंदाचे क्षण चोखंदळपणे वेचण्याची. उत्सवासारखे साजरे करण्याची. गणेशोत्सव, दसरा, दिवाळी अन् होळी अशा सणांचं वैशिष्ट्य असतं ते आरत्या, आरास, कंदील, रांगोळ्या, रंगांची उधळण, गोडधोड पदार्थ अशा विविधतेत दिसतं.

एकत्र जमून एकमेकांना शुभेच्छा देऊनच हे आनंदसोहळे साजरे केले जातात. असे सणवार म्हणजे आनंदोत्सवी क्षणांची देवघेव असते. त्याचप्रमाणे विनोदाचा गाभा असलेली नाटकं, चित्रपट प्रेक्षकांच्या मनांत हर्षभरली तरलता आपसूकच निर्माण करतात. आचार्य अत्रे यांचं 'मोरुची मावशी' हे नाटक याचं चपखल उदाहरण आहे. या नाटकात मावशीची भूमिका करणारा नट स्वत: पुरुष असल्याचं भान कायम राखत प्रत्येक प्रसंगात क्षणाक्षणाला हास्यस्फोट घडवतो. प्रेक्षागारातले सारे स्थळाकाळाचं, वयाच कसलही भान न ठेवता अशा प्रसंगांचा आनंद मनमुराद लुटतात. शेकडो प्रेक्षकांना आल्हाददायक आनंद वाटण्याचं महत्कार्य अर्थात आचार्य अत्र्यांची समर्थ लेखणी करते.काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या भावना आपले शत्रू आहेत अन् तेच मनाला मिळणाऱ्या आनंदात मोठे अडथळे निर्माण करतात. या रिपूंना दूर सारलं तरच सर्वांना हवंहवंस वाटणारं हर्षभरलं आनंदी वातावरण अपोआप निर्माण होतं. नातलग, मित्रमंडळी यांच्याबरोबर रंगलेल्या गप्पांमधल्या हलक्याफुलक्या थट्टामस्करीमुळे बोलण्यात वागण्यात मोकळेपणा येतो. मनं प्रफुल्लित होतात अन् असे सुखदायक आनंदाचे क्षण वारंवार अनुभवावेत, असं वाटू लागतं.

# दहीहंडी फोडण्याची स्पर्धा कोठे होते?



बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टीक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहिकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. याविषयीची अधिक माहिती कृगोनि- श्री कृ. गो. निकोडे गुरूजींच्या शब्दांत वाचा... संपादक.

हिंदू धर्माच्या मान्यतेनुसार सृष्टी पालनकर्ता श्रीहरी विष्णूचे अठरावे अवतार प्रभू श्रीकृष्ण आहे. म्हणून त्याच्या जन्मदिवशी गोकुळाष्टमी साजरी केली जाते. त्याच्याबद्दल सांगायचे झाले तर त्यांनी आपल्या भुतलावर म्हणजे पृथ्वीवर एक साधारण माणसाचा जन्म घेतला होता. त्याचा जन्म हा मानवधर्माचे रक्षण करण्यासाठी झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतभर हजारो वर्षांपासून हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. गोकुळाष्टमी भारतामध्ये वेगवेगळ्या भागांत वेगवेगळ्या पद्धतीने भ.श्रीकृष्ण मूर्तीचे पूजन करून केले जाते. त्यास कान्होबा बसविणे किंवा मांडणे म्हटले जाते. काही ठिकाणी भक्ती संगीत गायले जाते. तर काही ठिकाणी कृष्णमूर्तीला दही दुधाचा अभिषेक घातला जातो. श्रीकृष्ण जयंती व जन्माष्टमी किंवा गोकुळाष्टमी हा सण भारतामध्ये खुप आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी भगवान श्रीकृष्णाचा जन्म झाला होता. त्यामुळे संपूर्ण भारतामध्ये त्यांच्या जन्मदिवशी कान्होबा बसविणे वा दहीहंडीसारखे कार्यक्रम साजरे केले जातात. या दिवशी भगवान श्रीकृष्णाला वेगवेगळ्या नावांनी बोलावले जाते. जसे की गोविंद, बाल गोपाल, कान्हा, कान्होबा, गोपाल, केशव ही सर्व श्रीकृष्णांची प्रसिद्ध नावे आहेत. गोकुळाष्टमी ही भगवान श्रीकृष्णाच्या जन्मापासून हिंदू पंचांगानुसार भाद्रपद महिन्याच्या कृष्ण पक्षाच्या आठव्या दिवशी प्रत्येक वर्षी साजरी केली जात असल्याचे सांगितले जाते.भ.श्रीकृष्णाचा जन्म श्रावण महिन्यात वद्य अष्टमीला मध्यरात्री रोहिणी नक्षत्रावर मथुरेत कंसाच्या बंदीशाळेत झाला. म्हणून त्या दिवशी आनंदोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. अष्टमीच्या दिवशी काही लोक व्रतसुद्धा करतात. या दिवशी एकभक्त राहून पांढर्या तिळाचा कलप अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर फुले व पाकळ्यांनी सुशोभित करतात. त्यास्थानी देवकीचे सुतीकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि श्रीकृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. बाजूला यशोदा व तिची नवजात कन्या, वसुदेव व नंद यांच्याही मूर्ती बसवतात. त्या वेळी मथुरेमधील राजा अत्याचारी कंस याला प्रजा कंटाळली होती. तो प्रजेला असह्य यातना आणि त्यांच्यावर फार जुलूम करत होता. त्यामुळे तेथील प्रजा खूपच दुःखी व कष्टी होती. लोकांना त्या अत्याचारी राजापासून मुक्ती देण्यासाठी भ.श्रीकृष्णाने पृथ्वीवर जन्म घेतला. गोकुळाष्टमी या निमित्त होणारी हालचाल संपूर्ण भारतामध्ये दिसून येते. त्याचबरोबर परदेशी राहणाऱ्या भारतीय लोकांतसुद्धा गोकुळाष्टमी खुप धुमधडाक्यात साजरी केली जाते. भ.श्रीकृष्णाने पृथ्वीवर देवकी आणि वासुदेव यांच्या पोटी जन्म घेतला. भ.श्रीकृष्णाच्या जन्माच्या वेळेस आकाशवाणी झाली होती, की देवकीचा आठवा पुत्र कंसाचा वध करेल. कंसाच्या अत्याचारांनी संपूर्ण मथुरा नगरी त्रस्त झालेली होती. त्याच्या राज्यात राज्यांमध्ये निर्दोष लोकांना सुद्धा शिक्षा केली जाई. आपल्या मृत्यूच्या भीतीने त्याने एवढेच नव्हे तर आपली बहिण देवकी आणि तिचा पती वासुदेव ह्यांना सुद्धा काळ कोठळीमध्ये टाकले होते. एवढेच नव्हे तर कंसाने आपल्या अत्याचाराने देवकीचे सहा पुत्रही आधीच मारून टाकले होते.

भ.श्रीकृष्णांच्या जन्मदिवशी आकाशामधून घनघोर पावसाचा वर्षाव होण्यास सुरुवात झाली. बाल कृष्णाला सुरक्षित स्थानावर घेऊन जाण्यासाठी वसुदेव यांनी त्याला एका टोपलीत घेतले. यमुना नदी पार करत त्यांनी त्याला आपला मित्र नंद गोपालकडे नेले आणि त्यांनी आपल्या पुत्राला-बाल कृष्णाला यशोदा मातेपाशी झोपून ठेवून त्यांची कन्या घेऊन परत आले. अशा प्रकारे देवकीपुत्र भ.श्रीकृष्णाचे पालन-पोषण यशोदा मातेने केले. अशाप्रकारे भ.श्रीकृष्णाच्या दोन माता होत्या, एक जन्मदात्री आणि दुसरी पालनकर्ती. एक म्हणजे देवकीमाता आणि दुसरी म्हणजे यशोदामाता होय.

बाल कृष्ण हा फार प्रिय होता. असे मानले जाते की, बाल कृष्ण व त्यांचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर गोपाळकाला तयार करून सर्व वाटून खात असत. गोमंतकातील काल्याला गवळण कालासुद्धा म्हटले जाते. हे एक मिश्रण पौष्टीक आहार असते, म्हणूनही गोकुळाष्टमीचे महत्व अधिक आहे. कोकणात व महाराष्ट्रात उत्सवानिमित्त दहिकाला होतो. या ठिकाणीही हंड्या फोडून तर काही ठिकाणी गोपाळकाला होतो. गोकुळाष्टमीचे एक व्रतही सांगितले असून ते केल्याने संतती, संपत्ती व वैकुंठ लोक यांची प्राप्ती होते, असे वयोवृद्ध सांगतात. सप्तमीच्या मध्यरात्री सुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सहपरिवार भ.श्रीकृष्णाची पूजा करतात. अष्टमीच्या दिवशी देवालाही फराळ, नैवेद्य दाखवतात. गोपाल म्हणजे गायीगुरे व कायद्याचे पालन करणाऱ्या या भ.श्रीकृष्णाच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने दुसऱ्या दिवशी- गोपाळकाल्याच्या दिवशी काल्याचा प्रसाद केला जातो. यामध्ये काला म्हणजे एकत्र मिळवणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, भिजवलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी आदी घालून एक खाद्यपदार्थ तयार होतो, त्यास गोपालकाला असे म्हणतात.श्रीकृष्णभक्त गोकुळाष्टमीच्या उत्सवावर उपवास ठेवत असतात, मंदिरांना सजवले जाते तसेच गोपाळमूर्तीला पाळण्यात ठेवून झोका दिला जातो. भजन-कीर्तन केले जाते आणि त्यासोबतच तरुणांमध्ये दहीहंडी फोडण्याची स्पर्धा घेतली जाते. श्रीकृष्णनगरी मथुरामध्ये सुद्धा दुरून दुरून भक्तमंळी दर्शनासाठी येत असतात. त्या दिवशी संपूर्ण मथुरानगरी भ.श्रीकृष्णाच्या नामोच्चाराने दुमदुमून जाते. श्रीकृष्णाच्या लहानपणी लोणी, दही, दूध आपल्या मित्रांसोबत एकत्र येऊन चोरून खाण्याचा प्रयत्न करीत असत. दही हे त्यांचे आवडते खाद्य होते. म्हणून दहीहंडी महोत्सव त्यांच्या आठवणी निमित्त साजरा केला जातो. उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपाळकाला असे म्हणतात. कृष्णजयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषत कोकणात या सणानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला केला जातो. त्याचे जेवण करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे गोविंदा आला, गोकुळात आनंद झाला. असे गाणे म्हणत लहान-मोठे पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात.

कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून श्रीकृष्ण चरित्रातील सोंगे करण्याचीही प्रथा आहे. या दिवशी महाराष्ट्रात मुंबई येथे उच्च मडक्यात दही, दूध यांनी भरलेला हंडा ठेवून तिथपर्यंत मानवी मनोरेची स्थापना करून दहीहंडा फोडण्याचा साहसी खेळ होतो. महाराष्ट्रातील एक वैष्णव वृत्त आहे. श्रीकृष्ण त्याच्या मित्रांसोबत गाई चारण्यासाठी जात असत व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोर्या एकत्र करून त्या खाद्यपदार्थाचा काला केला व सर्वात सत्याचे रक्षण केले, अशी एक कथा आहे. म्हणून या दिवशी काला करण्याची व दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे. अशाप्रकारे गोकुळाष्टमी भारतातील विविध राज्यात मोठ्या आनंदाने व उत्साहाने साजरी केली जाते.

!! श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या समस्त भाविकांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# कृत्रिम बुद्धिमत्ता ही देणगी की भीषण आपत्ती?



कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (आर्टिफिशिअल इंटेलिजन्स - एआय) फायद्या-तोट्यांचे आकलन आणि अभ्यास जसजसा होत आहे, तसतसे त्याभोवतीचे धुके कमी होऊन नेमकेपणा येत आहे. अजूनही हे तंत्रज्ञान त्याच्या प्राथमिक अवस्थेत असल्यामुळे त्याची पूर्ण व्याप्ती आणि जीवसृष्टीवरील परिणामांचा अचूक वेध घेण्याच्या परिस्थितीत आपण पोचू शकलेलो नाही. तरीही, सध्याच्या रूपातील त्याचा आविष्कार काही सूचक निर्देश देत आहे. त्यामुळेच, हवामान बदलांमुळे उद्भवलेल्या संकटाशी मुकाबल्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा होऊ शकतो, याची उत्तरे शोधली जात नाहीत, तोच त्याच्या या आघाडीवरील दुष्परिणामांची चर्चाही झडू लागली.

वास्तविक, अफाट विश्लेषणक्षमता आणि गुंतागुंतीच्या संरचनांमधील संगती लावण्याचे कसब यांमुळे हवामान बदलांच्या दुष्परिणामांवर कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान उत्तरे शोधू शकेल, अशी आशा व्यक्त केली जाते. हवामान विषयक आपत्तींचा तडाखा बसत असतानाच त्याविषयीची माहिती व आकडेवारी यांचे विश्लेषण करू शकतील, असे अल्गोरिदम विकसितही झाले आहेत. वादळे, पूर, दुष्काळ यांसारख्या आपत्तींची तीव्रता, कालावधी आणि प्रभावक्षेत्र यांची नेमकी माहिती त्यामुळे मिळू शकते. त्यातून या आपत्तींचा मुकाबला करण्याचे उपाय करता येतील.

संभाव्य दुष्परिणाम आणि कारणे

ऊर्जानिर्मिती व वापराचे अधिक किफायतशीर आणि कार्यक्षम पर्याय एआयमुळे आपल्यासमोर येऊ शकतात. परंतु प्रतिक्षिप्त क्रियेच्या रूपात या लाभाचा उलटा परिणाम होण्याचाही धोका संभवतो. असे संभाव्य दुष्परिणाम असे :

अधिक ई-कचरा : एआय परिसंस्थेसाठी व्यापक तंत्रपरिसंस्था आवश्यक ठरते. त्यामध्ये अधिक संख्येने संगणकही आवश्यक ठरतात. स्वाभाविकच ते कालबाह्य होतील तसे जैवविघटनकारी नसणाऱ्या ई-कचऱ्यात भर घालत राहतील.

अतिरिक्त ऊर्जावापर : एआय परिसंस्थेच्या संचालनासाठी होणारा प्रत्यक्ष ऊर्जावापर सध्याच्या तंत्रज्ञानावरील वापरापेक्षा अधिक असेल. यातून अधिक कर्बोत्सर्ग होईल.

वीजजाळ्यांवर अतिरिक्त ताण : कोणतेही नवे तंत्रज्ञान आले की विजेची मागणी वाढते. त्यामुळे, एकीकडे खनिज इंधनांचा वापर कमी करण्याची गरज व्यक्त होत असताना प्रत्यक्षात तो वाढण्याचा धोका उद्भवतो.

माहितीसाठ्याची गरज : एआयचा वापर वाढेल तशी त्याच्या माहितीसाठ्याची गरजही वाढेल. त्याची देखभाल ही ऊर्जेची गरज वाढवेल आणि कर्बठसाही.

अनुमानांमधील चूक : शुद्धलेखनातील चुका दुरुस्त करण्यापासून घराबाहेर पडण्यापूर्वी हवामानाचा अंदाज घेण्यापर्यंत हरघडी आपण आता अप्रत्यक्षपणे एआयचा आधार घेत आहोत. परंतु त्यासाठी उपलब्ध माहितीवरून अनुमान काढण्यासाठी आणि कार्यवाही ठरवण्यासाठीही या तंत्रज्ञानावर विसंबून राहण्याला मर्यादा असू शकतात. एखाद्या नैसर्गिक आपत्तीत एआयच्या अल्गोरिदमने दाखवलेला मार्ग अनुसरणे धोक्याचे ठरू शकते.एआयमुळे ऊर्जावापर कसा वाढतो, याचे उदाहरण म्हणून चॅट जीपीटीचे परिणाम पाहू. मानवी भाषाव्यवहार आणि त्यावर आधारित माहिती यांचा अर्थ लावणे आणि त्याच्या आधारे अपेक्षित माहिती पुरवणे हे काम हा आभासी सहायक करतो. जीपीटी-३ हा चॅटबॉट म्हणजे त्याची सुरुवातीची आवृत्ती होती. या चॅटबॉटला पुरवलेल्या ज्या माहितीसाठ्यामुळे तो सेवा पुरवू शकला, त्याला लार्ज लँग्वेज मॉडेल म्हणतात. त्याचा पुरवठा करून जीपीटी-३ला प्रशिक्षण देणे हे ५०० टन एवढ्या कार्बन डायऑक्साइडच्या उत्सर्गाला कारणीभूत ठरले आहे! याच कंपनीच्या एआय तंत्रज्ञानाचा वापर करून आपण एखादे चित्र तयार करून घेतले तर एखादा स्मार्टफोन पूर्ण चार्ज होण्याएवढी वीज त्यासाठी खर्ची पडते. जगभर रोज साडेतीन कोटी चित्रांची एआयद्वारे निर्मिती केली जाते आणि ही फक्त या तंत्रज्ञानाची सुरुवात आहे.

गुगल ही तंत्रज्ञान क्षेत्रातील जगातील सर्वांत ठळक कंपनी. आपल्या तंत्रसेवा काळानुरूप आणि स्पर्धेत सरस ठराव्यात, यासाठी तीही प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. परंतु त्याचा भलताच परिणामही होत आहे. या कंपनीमुळे होणारा हरितगृह वायूंचा उत्सर्ग एआयच्या वापरामुळे वाढला आहे. २०१९च्या स्तरापेक्षा २०२४मध्ये तो ४८ टक्क्यांनी अधिक असल्याचे कंपनीने वार्षिक पर्यावरण अहवालात मान्य केले. आपल्या डेटा सेंटरकडून वाढलेला ऊर्जावापर आणि पुरवठा साखळीतील उत्सर्ग ही त्यामागील प्रमुख दोन कारणे यात नमूद आहेत.

कंपनीने सर्व कामकाज इ.स. २०३०पर्यंत पूर्णतः कर्बभारमुक्त करण्याची घोषणा केली असली, तरी हे उद्दिष्ट कंपनीला आता 'अत्यंत महत्त्वाकांक्षी' वाटते आहे. एआयचे भवितव्य आणि त्याच्या पर्यावरणावरील परिणामांचे न काढता येणारे अनुमान, यामुळे गुगलही आज संदिग्ध भूमिकेत आहे.

तूर्त तरी हे आव्हान गुगलपेक्षा जीपीटीसारख्या थेट एआय आधारित सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांसाठी अधिक आहे. कारण, गुगलवरील एका शोधासाठी ०.३ वॉट प्रतितास एवढा सरासरी वीजवापर होतो, तर जीपीटीसाठी तो २.९ वॉट प्रतितास आहे. परंतु गुगलरूपी भस्मासुराची व्याप्ती महाकाय आहे. त्यामुळे त्या कंपनीने भविष्यात एआय अंगिकारल्यास आयर्लंडसारख्या प्रगत देशाएवढी अतिरिक्त ऊर्जा गुगलही वापरू लागेल. तशी परिस्थिती ओढवू नये, या हेतूने शीतकरणासाठीच्या पाण्याचा फेरवापर करण्यासाठीचे उपाय कंपनी करत आहे. २०३०पर्यंत हा फेरवापर १२० टक्के व्हावा, असे उद्दिष्ट आहे. सध्या ते १८ टक्के आहे.

एआयमय तंत्रप्रगतीत भारत तूर्त धिमी पावले टाकत आहे. एआयसंबंधीची नियामक कार्यचौकटही आपल्या देशात निश्चित नाही. परंतु २०१८पासून त्या-त्या टप्प्यावरील प्रतिसादात्मक उपाय सरकारने लागू केले. इंटरनेट ग्राहकांसाठी कोणतेही लार्ज लँग्वेज मॉडेल किंवा अल्गोरिदम अमलात आणण्यासंबंधी मार्चमध्ये जारी केलेल्या मार्गदर्शक सूचना ही त्यातील सर्वांत ताजी घडामोड. परंतु तूर्त तरी, हवामान बदलावरील एआयचे दुष्परिणाम हा दखलपात्र नाही.अर्थात, कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे हवामान बदलांचा धोका वाढण्याचीच शक्यता आहे, असा याचा अर्थ नाही. या संकटाचा मुकाबला करण्याचे मार्ग सुचवण्या-दाखवण्याबरोबरच स्वतः या संकटाला कारणीभूत न होण्याची क्षमताही एआयमध्ये विकसित होऊ शकते.

हे साधण्यासाठी डेटा सेंटरचे शीतकरण, कार्यक्षम ऊर्जावापर, अक्षय ऊर्जेकडे संक्रमण, ऊर्जास्नेही हार्डवेअर, अल्गोरिदममधील सुधारणा अशा उपायांचेही प्रयोग सध्या होत आहेत. मायक्रोसॉफ्ट, गुगल अशा कंपन्या त्यात सहभागी आहेत. त्या मंथनातून काही सकारात्मक परिणाम समोर येतील आणि मानवजीवन अधिक सुसह्य होईल. कदाचित, मानवी प्रतिभेला आव्हान देणाऱ्या या प्रश्नावरील उत्तर खुद्द एआयकडेही असू शकेल. तसे घडले, तर ते अंतिमतः मानवतेच्या शाश्वत कल्याणाचे ठरेल की कसे, हा मात्र स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरेल!

### कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत कायदेशीर अभ्यासानंतर निर्णय

# मुख्यमंत्री कायद्याचे अभ्यासक, त्यामुळे ते निर्णय घेण्यास सक्षम-गिरीश महाजन

**नाशिक(वृत्तसंस्था)**
राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने एका प्रकरणामध्ये २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. यानंतर विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात वरिष्ठ नेते कायदेशीर अभ्यास करून निर्णय घेतील, असे जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. हा प्रश्न तांत्रिक बाबीत अडकला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः याकडे लक्ष ठेवून आहेत, असेही ते म्हणाले.
प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिला हप्ता लाभार्थ्यांना देण्यासाठी शनिवारी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासह नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबतही भाष्य केले.
माणिकराव कोकाटेंबाबत कायदेशीर बाब आणि तांत्रिक बाब आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री लक्ष ठेवून आहेत. जे नियमानुसार असेल, जे सर्वांसाठी होते ते त्यांच्यासाठी देखील होईल, असे गिरीश महाजन म्हणाले. राजीनाम्याची मागणी तर सगळेच करतात. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची देखील मागणी होत आहे. अनेकवेळा कुठे काही घटना घडली, तर गृहमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी झालेली १०० वेळा बघितली असेल, असे गिरीश महाजन म्हणाले.राजीनाम्याच्या मागण्या रोज होत असतात. पण या सर्व बाबी नियमाच्या आधीन राहुनच कराव्या लागतात. तांत्रिकदृष्ट्या सर्व बाब तपासली जाईल आणि त्यानंतरच राजीनामा घ्यायचा की नाही, यावर निर्णय होईल. मुख्यमंत्री हे कायद्याचे अभ्यासक आहेत, त्यामुळे ते निर्णय घेण्यास सक्षम आहेत. दोन्ही उपमुख्यमंत्री देखील अतिशय अनुभवी आहेत. अधिकाऱ्यांशी चर्चा करून निर्णय घेतील, असे गिरीश महाजन यांनी सांगितले.गिरीश महाजन यांनी नाशिकच्या पालकमंत्री पदाबाबतही भाष्य केले. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी कमी कालावधी राहिला आहे. पालकमंत्री नियुक्त करण्यासही उशीर झाला आहे. गृहमंत्री अमित शाह पुण्याच्या दौऱ्यावर आहेत. सकाळीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी त्यांची भेट घेतल्याचे समजते. या भेटीत पालकमंत्रिपदाबाबत चर्चा झालीच असेल. येत्या दोन दिवसांतच हा तिढादेखील सुटेल, असा आशावाद गिरीश महाजन यांनी व्यक्त केला. पालकमंत्री कोण होईल याबाबत विचारले असता, देवाच्या मनात असेल तसे होईल, असे ते म्हणाले.



# विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करुन जीवनात प्रगती करावी-करांडे

### सिंदखेडच्या रामेश्वर विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप समारंभ



**गेवराई । प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात असताना आपले ध्येय निश्चित करुन पुढे कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे त्याचे एक ध्येय ठरवले पाहिजे. यशस्वी होण्यासाठी केवळ प्रमाणपत्रे पुरेशी नाहीत तर ध्येय असणे आवश्य आहे. ज्ञान व ध्येयाशिवाय आपण यशस्वी होऊ शकत नाही असे प्रतिपादन रामेश्वर विद्यालयाचे सचिव तथा मुख्याध्यापक संभाजी करांडे यांनी व्यक्त केले.
सिंदखेड येथील अग्रगण्य शिक्षण संस्था प.पु.गुरु गणपत बाबा शिक्षण प्रसारक मंडळ, संचलित रामेश्वर विद्यालय सिंदखेड येथे दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी ते बोलत होते. सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक संभाजी करांडे यांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पुजन झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती गुजर ह्या उपस्थित होते. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यश प्रत्येकालाच हवं असतं, पण ते मिळवण्यासाठी योग्य दिशेने प्रयत्न करणे देखील आवश्यक असतं. बरेचदा प्रयत्न करुनही यश पदरात पडत नाही अशा वेळी पदरी निराशा येऊ शकते. पण त्यावेळी आपण केलेल्या चुकांचं निरीक्षणकरून त्या चुका पुन्हा न करता अचूकपणे मार्गक्रमण केल्यास यशाची पायरी नक्कीच चढता येऊ शकते असे मत श्रीमती गुजर यांनी व्यक्त करुन विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहशिक्षक बांगर यांनी केले. तर विद्यार्थ्यांना जोगदंड, अजबे , शेरकर यांनी परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लिंबकर यांच्या मार्गदर्शनाखाली कु.साक्षी वाळेकर, कु. तृप्ती ठोसर यांनी तर आभार आदित्य मात्रे यांनी व्यक्त करुन दहावीच्या निरोप समारंभाची सांगता झाली.कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चेन्नई येथील इंडियन डेंटल शाखेच्या परिषदेमध्ये अहिल्यानगर डेंटल शाखा ९ पुरस्काराने सन्मानित

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
चेन्नई येथे इंडियन डेंटल शाखेची ७५ व्या परिषदेमध्ये अहिल्यानगर डेंटल शाखेचा ९ पुरस्कार देवुन सन्मान करण्यात आला. यावेळी शाखेच्या सचिव डॉ.नेहा जाजू यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी जनरल सेक्रेटरी डॉ. अशोक ढोबळे, डॉ. रविंद्र नाथ, डॉ.शुभ्रा नंदी, डॉ.राजीवकुमार चुग आदी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. इंडियन डेंटल अहिल्यानगर शाखेने राज्यात चांगली कामगिरी केल्याने त्यांना ९ पुरस्कार देवुन डेंटल परिषदेमध्ये गौरविण्यात आले. याप्रसंगी अहिल्यानगर शाखेच्या सचिव नेहा जाजू म्हणाल्या की, हा जो पुरस्कार शाखेला मिळाला, तो आमच्या सुंपूर्ण शाखेचे टिमवर्क होय. तसेच तत्कालीन अध्यक्ष डॉ.मनिषा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली डेंटल




शाखेने उत्कृष्ट असे काम केले आहे. असे त्या म्हणाल्या. यावेळी बोलताना डॉ.जाजू म्हणाल्या की आहिल्यानगरच्या इंडियन डेंटल शाखा खरोखरच पुरस्कारास प्राप्त ठरल्या आहेत. शाखेच्या सर्व पदाधिकारी या महिला असल्याने त्यांनी आपल्या कार्याने संपूर्ण राज्यात खरोखरच कौतुकास पात्र आहे. येथील चेन्नई येथील सेमिनारच्या माध्यमातून निश्चितच सर्व दंत वैद्यकीय यांना खूप काही शिकण्यासाठी मिळाले, असे त्या म्हणाल्या. यावेळी बेस्ट लोकल ब्रांच प्रेसिडेंट डॉ. मनीषा कुलकर्णी, बेस्ट सेक्रेटरी डॉ. नेहा जाजू, रनर ऑफ ट्रॉफी बेस्ट लोकल ब्रांच जनरल डॉ.अमृता देडगांवकर, ऑल राऊंड ॲक्टिव्हिटी लोकल ब्रांच, सायंटिफिक ॲक्टिव्हिटी अवॉर्ड, बेस्ट सी.डी.एच.ॲक्टिव्हिटी, रुलर ॲक्टिव्हिटी अवॉर्ड, स्कूल डेंटल हेल्थ, अवॉर्ड स्टूडंट ॲक्टिव्हिटी आदीबाबत गौरव करण्यात आला.

# ऐतिहासिक भुईकोट किल्ला अनमोल ठेवा, त्याचे जतन,संवर्धन व्हावे-डॉ.उद्धव शिंदे

### एम के सी एल मार्फत किल्ल्यात स्वच्छता मोहीम

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
अहिल्यानगर शहरातील ऐतिहासिक भुईकोट किल्ला हा अनमोल ठेवा आहे, या किल्ल्याचे जतन आणि संवर्धन होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन स्नेहबंध फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले. भुईकोट किल्ल्यात शहरातील एम के सी एल मार्फत स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. यावेळी श्रीकृष्ण कॉम्पुटर्स इन्स्टिटट्युटचे संचालक जालिंदर चौरे, आशा चौरे, ओंकार कॉम्पुटर्सचे संचालक अभिजीत भुतकर, शितल भुतकर, रोटरी क्लबचे सदस्य अमोल बास्कर, रवि राऊत उपस्थित होते. किल्ल्यातील वाढलेली झाडे-झुडपे तोडत बुरुजावर झालेले अतिक्रमण मोकळे करण्यात आले. बुरुजावर धूळ, भोवतीची वाढलेली झाडी दूर झाल्यामुळे गडाच्या बुरूजांनी मोकळा श्वास घेतला. त्यामुळे किल्ल्याला भेट देण्यासाठी येणाऱ्यांना किल्ला व्यवस्थित पहाता येणार आहे. या स्वच्छता मोहिमेत सुमारे ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यावेळी डॉ. शिंदे बोलत होते. किल्ल्यात प्लास्टिकचा कचरा यामुळे अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले होते. त्याची दखल घेत एम के सी एल, श्रीकृष्ण व ओंकार कॉम्प्युटर्सचे संचालक व विद्यार्थ्यांनी किल्ल्याची स्वच्छता केली. बाटल्या, प्लास्टिकच्या बाटल्या, वेफर व बिस्किटांची पाकिटे व जुने कपडे इत्यादी कचरा जमा केला. त्यामुळे या किल्ला परिसराने मोकळा श्वास घेतला. डॉ. शिंदे म्हणाले, किल्ल्यात व परिसरात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची नोंद व तपासणी होणे आवश्यक आहे. त्यामुळे किल्ल्यात अस्वच्छतेला आळा बसेल.

# खेळाच्या मैदानांचा खेळासाठीच वापर करा उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश

### भूखंड भाडेपट्टा नूतनीकरणासाठी नवीन धोरण ठरवणार

**मुंबई (वृत्तसंस्था)**
खेळांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. मुंबईतील ओव्हल मैदान, आझाद मैदान व क्रॉस मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराचे क्रीडा क्लबसोबत नूतनीकरण करण्यासाठी महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कोणत्याही परिस्थितीत खेळांची मैदाने केवळ खेळांसाठीच वापरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.मुंबईतील आझाद मैदान, क्रॉस मैदान आणि ओव्हल मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराच्या नूतनीकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)चे सचिव सदाशिव साळुंखे, क्रीडा विभागाचे आयुक्त हिरालाल सोनवणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), नियोजन विभागाचे सहसचिव दीपक देसाई, महसूल विभागाचे उपसचिव धनंजय निकम, नगरविकास विभागाचे सहसचिव निर्मलकुमार चौधरी, विधी व न्याय विभागाच्या उपसचिव मनिषा कदम, मुंबईचे अतिरिक्त जिल्हाधिकारी रविंद्र कटकधोंड, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष संजय नाईक, सचिव अभय हडप, सहसचिव दीपक पाटील, खजिनदार अरमान मल्लिक, कार्यकारी सचिव



सी. एस. नाईक, सदस्य संदीप विचारे, प्रमोद यादव आणि महाव्यवस्थापक किंजल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.
उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदान ही सर्व खेळांसाठी महत्त्वाची मैदाने आहेत. या मैदानांवर हजारो क्रीडापटू रोज विविध क्लबच्या माध्यमातून प्रशिक्षणासह खेळाचा सराव करत असतात. या तिन्ही मैदानाची मालकी महसूल विभागाची आहे. क्रीडा विभागामार्फत ती खेळाच्या क्लबला भाडेपट्टा कराराने देण्यात येतात. सध्या या तिन्ही मैदानांवरील भूखंडांवर साठहून अधिक क्लब खेळाडूंना प्रशिक्षणाच्या व सरावाच्या सुविधा देतात. या क्लबचा भाडेपट्टा करार संपला असून तो पुन्हा करण्यासाठी महसूल विभाग, क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने एक स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करावे. हे नव्याने तयार करण्यात येणारे धोरण मंजुरीसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येईल. महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास या चारही विभागांनी विहित वेळेत भाडेपट्टा करारासाठीचे सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.तसेच आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदानावर खेळाडूंसाठी स्वच्छतागृहे व चेंजिंग रूम उभारण्याच्या सूचना देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, ही स्वच्छतागृहे अत्याधुनिक करताना खेळाच्या सरावाला बाधा येऊ नयेत, तसेच मैदानाचे सौंदर्य खराब होऊ नये याची दक्षता घेत ती मैदानाच्या एका कोपऱ्यात उभारण्यात यावीत. कोणत्याही परिस्थितीत खेळाच्या मैदानांचा वापर केवळ खेळांसाठीच व्हावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# नागसेन बुद्ध विहार येथे संतश्रेष्ठ गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात संपन्न

## वाचाल तर वाचाल तर्फे ५० पुस्तके वितरित करून विनम्र अभिवादन

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांनी शिक्षणाकरिता भांडीकुंडी विका उपाशी पोटी राहा पण आपल्या पाल्यास शिक्षण द्या व अंधश्रद्धा, आळस,नशा पाणी मादक पदार्थ व कर्जबाजारीपणा पासून देवाचे नवस फेडणे, यापासून दूर राहण्याचा व माणसाची सेवा हीच ईश्वराची सेवा आहे. स्वतः ग्रामस्वच्छता करून परिसर स्वच्छतेचे महत्व सागनारे माणसातच देव आहे हे आपल्या अनमोल कीर्तनातून बोली भाषेत बहुजन समाजाला समजावून सांगणारे संतश्रेष्ठ संत गाडगेबाबा यांना नागसेन बुद्ध विहार धानोरा रोड बीड येथे वाचाल तर वाचाल या फिरते मोफत वाचनल्यातर्फे विहार परिसरातील विद्यार्थ्यांकरिता ५० पुस्तकांचा संच वाचनालयाचे डी.जि वानखेडे यांनी प्रमुख उपस्थित असलेले सरस्वती विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष मा.उत्तमराव पवार व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस. वाघमारे यांच्या हस्ते वितरित करण्यासाठी श्रबौद्धाचार्य डी. एन. पोटभरे यांना सुपूर्त केला व संत गाडगेबाबा यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. या संचामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, अहिल्यादेवी होळकर, संत गाडगेबाबा, डॉ एपीजे अब्दुल कलाम, स्वामी विवेकानंद , व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे काय अशा विविध विषयावरील पुस्तकांचा समावेश आहे. सर्वप्रथम तथागत महात्मा गौतम बुद्ध यांच्या प्रतिमेस पुष्प , डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्प व पुष्पमाला अर्पण करून महिला मंडळा हासते अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सुनील कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना संत गाडगेबाबांनी त्यांना मिळालेल्या दानातून धर्मशाळा बांधल्या व गोरगरिबांच्या



शिक्षणाच्या करिता शिक्षणाचे कार्य करणाऱ्या धर्मदाय संस्थांना वस्तीगृह किंवा शाळेकरीता दिल्या. त्यांनी त्यांच्या जीवनात समाज सुधारण्याकरता अनिष्ट रूढी परंपरा पासून दूर राहण्याकरिता केलेल्या अनेक कार्याबद्दल सविस्तर माहिती दिली. महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले यांनी अभिवादन प्रसंगी सांगितली की विहारे ही संस्कार केंद्रे व्हावीत तसेच समाज बांधवात विचारविनिमय होण्याची केंद्रे व्हावीत असे स्पष्ट केले. याप्रसंगी वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचना लायाच्या कार्यपद्धतीबद्दल सविस्तर माहिती वाचनायाचे डी. जी. वानखेडे यांनी दिली. मुलांच्या हातात चांगली पुस्तके वाचन संस्कृती वाढवण्याकरता हे वाचनालय प्रयत्न करीत आहे. त्यास बीड शहरातील विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद मिळत आहे. कार्यक्रमास कॅप्टन राजाभाऊ आठवले, के. एस. वाघमारे, अँड. तेजस वडमारे, विहारांच्या महिला मंडळाच्या केशर कांबळे, सुनिता शिंदे, विमल डोळस, अंजली वीर, निकिता वीर, सानवी वीर, विद्या कोरडे, शालीन वीर, सुनिता शिंदे, प्रांजल वीर व, रवी सोनवणे, के बी गायकवाड, श्रीरंग डोळस, एम एल गायकवाड, सम्यक विद्यागर, दादासाहेब गायकवाड, एम एल गायकवाड, दादासाहेब जाधव, व परिसरातील बहुसंख्य महिला, पुरुष बालकांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.एम. विद्याधर यांनी व्यक्त केले.सरणातयणे कार्यक्रमाची सांगता झाली.

# राजमुद्रा संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष बबलु भैय्या शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड येथे भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन

## गेल्या ११ वर्षापासून राजमुद्रा संघटनेचे बबलू भैय्या शिंदे रक्तदान शिबिराच्या माध्यमातून रुग्ण सेवा

**बीड । प्रतिनिधी**

सदैव सामाजिक उपक्रमात सहभागी असणारे व सर्व सामान्यांच्या अडी अडचणी वेळी हाकेला धावून जाणारे तसेच राजमुद्रा सामाजिक संघटना मराठवाडा अध्यक्ष दिलदार व्यक्तीमत्व असणारे सामाजिक कार्यात सक्रिय असलेले युवा नेते बबलु भैया शिंदे याच्या वाढदिवसानिमित्त राजमुद्रा सामाजिक संघटना महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ०१/०३/२०२५ रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन राजमुद्रा सामाजिक संघटना मार्फत बीड येथील कार्यालय, अंबिका चौक, पांगरी रोड, बीड येथे आयोजित केला आहे. तसेच या वाढदिवसानिमित्त राजमुद्रासामाजिक संघटनेच्या माध्यमातून बीड शहरात विविध सामाजिक कार्यक्रम रक्तदान शिबीर, वृक्षारोपण कार्यक्रम, अनाथ बालकांना पाठ्यपुस्तके वाटप कार्यक्रम आयोजित केले आहे. या सामाजिक उपक्रमात मराठवाड्यातील तसेच बीड जिल्ह्यातील राजमुद्रा सामाजिक संघटनेचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच युवानेते बबलु भैया शिंदे यांचे खंदे समर्थक असलेले युवा वर्ग या रक्तदान शिबीरात शेकडोच्या संख्येने हजर राहून या रक्तदान शिबारात आपले भरीव योगदान देणार आहेत. तसेच युवानेते बबलु (भैय्या) शिंदे हे दरवर्षी प्रमाणे आपल्या वाढदिवस दीवशी रक्तदान करुन आपल्या मित्र मंडळींनाही रक्तदान करण्यासाठी आवर्जुन प्रेरीत करुन



समाजाला रक्तदान महादान हा संदेश देण्याच काम ते आपल्या वाढदिवस दीवशी करणार आहेत. युवानेते बबलु (भैय्या) शिंदे हे रक्तदान शिबिराचा उपक्रम बीड शहरातील शाहूनगर येथील सर्व मित्र मंडळींना सोबत घेऊन गेल्या अकरा वर्षांपासून मनोभावे रक्तदान शिबिरातून जनतेसाठी ही रुग्ण सेवा करत आहेत. त्यामुळे यानिमित्ताने दिनांक ०१/०३/२०२५ रोजी बबलु भैय्या शिंदे यांचा वाढदिवस असुन. यादिवशी या होणाऱ्या भव्य रक्तदान शिबिरात बीड शहरातील तरुण वर्गांनी मोठया संख्येने या रक्तदान शिबीरात आपला सहभाग नोंदवून बबलु भैय्या शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी येयचे आहे. असे आवाहन राजमुद्रा सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा नगरसेवक, बीड जिल्ह्यातील लाखो युवकांचे नेते आणि प्रेरणा स्थान सलेले किशोर आप्पा पिंगळे साहेब यांनी केले आहे.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाईव्ह प्रक्षेपणास उत्स्फूर्त प्रतिसाद



**छ.संभाजीनगर । प्रा.संजय तुपे**

भेंडाळा ता. गंगापूर येथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर लाभार्थ्यांसाठी बालेवाडी येथे केंद्रीय गृहमंत्री माननीय अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे लाईव्ह प्रक्षेपण भेंडाळा गावात करण्यात आले, ज्याला लाभार्थ्यांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या वेळी गावातील प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या नागरिकांना या योजनेबाबत अधिक माहिती मिळाली. ग्रामसेवक राहुल सराटे, सरपंच कमलबाई गाडेकर, उपसरपंच राहुल तुपे,प्रदीप परभणे,युवा प्रशिक्षणार्थी मुख्यमंत्री योजना दूत शिवाजी परभणे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक प्रधान सर, माजी सरपंच ज्ञानेश्वर सवाई, तसेच काळे सर व चोरमले सर ,संतोष मोढे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे, बेळगाव येथील काही घरकुल लाभार्थी देखील या कार्यक्रमास साक्षी राहिले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गोरगरीब कुटुंबांना घराचे स्वप्न साकार होत असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले. लाभार्थ्यांनीही या योजनेबद्दल समाधान व्यक्त करत शासनाचे आभार मानले.

# ऑल इंडिया ऑर्गनायझेशनच्या वतीने कार्यशाळेचे आयोजन

**जालना । असलम कुरेशी**

जालन्यात रविवारी ऑल इंडिया मुतवल्ली इनामदार ऑर्गनायझेशनच्या वतीने उर्दू हायस्कूलमध्ये एका विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. मुतवल्ली, इनामदार आणि काझी यांचे हक्क, जबाबदाऱ्या आणि वक्फ मालमत्तेच्या संरक्षणाबद्दल जागरूकता निर्माण करणे या उद्देशाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जमियत उलमा-ए-हिंदचे प्रदेश अध्यक्ष मौलाना हाफिज़ मोहम्मद नदीम सिद्दीकी हे होते. यावेळी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे चेअरमन काझी समीर, सय्यद इफ्तिखार हाश्मी, काझी सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष मो. शफ़ी काझी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन ऑल इंडिया मुतवल्ली इनामदार संघटनेचे अधिकारी अमजद फारुकी, इम्रान शाह, मुश्ताक अली, अझीम मनसबदार आणि इतर आयोजकांनी केले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला, वक्फ मालमत्तेचे जतन आणि व्यवस्थापन यावर सखोल चर्चा झाली. हाफिज़ मोहम्मद नदीम सिद्दीकी यांनी वक्फ मालमत्तेच्या कायदेशीर बाबींवर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, वक्फ मालमत्ता ही समाजाचे एक ट्रस्ट आहे. त्याचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. मुतवल्ली आणि इनामदारांनी त्यांची कर्तव्ये जबाबदारीने पार पाडावीत. काझी समीर यांनी वक्फ मालमत्तेच्या गैरवापराबद्दल जागरूकता निर्माण करण्यावर भर दिला. सभेला संबोधित करताना ते म्हणाले, वक्फ मालमत्तेचे रक्षण करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम केले पाहिजे. मुतवल्लींनी कायद्याच्या कक्षेत राहून त्यांच्या जबाबदाऱ्या पार पाडल्या पाहिजेत. सय्यद इफ्तिखार हाश्मी यांनी वक्फ बोर्डाच्या विविध योजनांची माहिती दिली. ते म्हणाले, वक्फ मालमत्तेचा वापर समाजाच्या शैक्षणिक आणि आर्थिक प्रगतीसाठी केला पाहिजे. तसेच प्रत्येक मुतवल्ली आणि इनामदाराने वक्फ बोर्डाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढे यावे. कार्यशाळेत सहभागी झालेल्या मुतवल्ली, इनामदार आणि काझींनी त्यांच्या समस्या आणि शंका मांडल्या. तज्ज्ञांनी योग्य मार्गदर्शन केले आणि उपाय सुचवले. कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित केल्याबद्दल आयोजकांचे विशेष कौतुक करण्यात आले. कार्यशाळेच्या समारोपाच्या वेळी उपस्थित मान्यवरांनी वक्फ मालमत्तेच्या जतनासाठी असे कार्यक्रम वारंवार आयोजित करण्याची आवश्यकता व्यक्त केली. या कार्यक्रमात मुतवल्ली, इनामदार, काझी आणि मराठवाड्यातील प्रतिष्ठित व्यक्ती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेस शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग नागनाथ शिंदे यांची सदिच्छा भेट

## शाळेतील विविध उपक्रम,विद्यार्थी, इमारत, स्वच्छता,याबद्दल शालेय प्रशासनाचे केले अभिनंदन

**केज । प्रतिनिधी**

बीड जिल्हा माध्यमिक विभागाचे शिक्षण अधिकारी माननीय श्री नागनाथ शिंदे साहेब हे दिनांक २२ रोजी केज दौऱ्यावर असताना केज तालुक्यातील सी बी एस ई बोर्डाची अधिकृत मान्यता असलेली एकमेव शाळा शारदा इंग्लिश स्कूल केज शाळेस सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी शाळेत शाळेअंतर्गत इयत्ता आठवी व नववीच्या वर्ग भेट देऊन अध्ययन व अध्यापन विषयक माहिती घेतली. याप्रसंगी विद्यार्थ्यांशी चर्चा करून समाधान व्यक्त केले. या प्रसंगी त्यांनी विविध वर्गांना भेटी दिल्या, शाळेच्या वतीने त्यांच्यासमवेत शाळेचे व्यवस्थापक श्री देशमुख पी एम,उपप्राचार्य सुरज सनी यांची प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी त्यांना शाळेतील विविध उपक्रमाबद्दल शाळेतील माहिती देण्यात आली. परिसराची पाहणी केल्यानंतर शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रम,स्वच्छता, विद्यार्थी संख्या, गुणवत्ता



पूर्ण शिक्षण याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. शाळेची भव्य इमारतीमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे काम शारदा इंग्लिश स्कूल केज यांच्या माध्यमातून होत असल्याने त्यांनी संस्थेचे सचिव माननीय रमेशरावजी आडसकर साहेब, प्राचार्य मिश्रा एस एम व सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले शाळेला सदिच्छा भेट दिल्याबद्दल संस्थेचे सचिव माननीय रमेशराव आडसकर साहेब यांच्यावतीने शालेय प्रशासनाने स्वागत केले व त्यांचे आभार मानले.

# शिवरायांच्या पुतळ्याचे सुशोभीकरण करण्या साठी पाच लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे मोठ्या जल्लोषात शिवरायांचा पुतळा उभारण्यात आलेला आहे. छत्रपतींच्या जयंतीच्या अगोदर सदरील पुतळा उभारण्यात आल्याने गावकऱ्यांसह परिसरातील शिवप्रेमी आनंदी आहेत. आणि यातच आता आणखीन आनंदाची भर पडली असून शिवरायांच्या पुतळ्याच्या शुशोभीकरणासाठी खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून पाच लक्ष रुपयांचा फंड बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी जाहीर केला आहे. तालुक्यातील आनंदगाव सारणी येथे शिवरायांचा पुतळा उभारल्यानंतर मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. आणि याचाच एक भाग म्हणून बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी शनिवारी दिनांक २२ फेब्रुवारी रोजी आनंदगाव येथे जाऊन शिवरायांच्या पुतळ्याला अभिवादन केले आणि शिवपूजनही करण्यात आले. यावेळी राहुल सोनवणे यानी खासदार रजनीताई पाटील यांच्या माध्यमातून पुतळ्याच्या सुशोभिकरणासाठी पाच लक्ष रुपयाचा निधी जाहीर केल्याने गावकऱ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून येत होता. सुशोभीकरणासाठी पाच लक्ष रुपये जाहीर केल्यामुळे आनंदगाव आणि परिसरातील गावकऱ्यांनी खासदार रजनीताई पाटील तसेच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी आनंदगावच्या सरपंच अंजली गायकवाड, सारणीचे सरपंच संतोष सोनवणे, चेअरमन संजय गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077